जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 17/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 29.12.2021

दिनांक 31.12.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका
स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना

विषय क्रं. 01

प्रस्ताव

जयभीमनगर नांदेड येथे शासनाच्या महसूल विभागाची जवळपास 01 हेक्टर (अडीच एकर) आहे. ती जमीन अनूसुचीत, नवबौध्द विद्यार्थ्यांचे वस्तीगृह बांधण्यासाठी शासनाने समाजकल्याण विभागाला दिली होती. पण कालांतराने इमारत जीर्ण झाल्यामुळे समाजकल्याण विभागाने वस्तीगृह रिकामे करुन इतरत्र भाडेच्या जागेत हलविले.

मागील 15 वर्ष पासून त्या इमारतीचा आणि मोकळया जागेचा कांहीही वापर होत नाही उत्तर नांदेड आणि दक्षिण नांदेड भागात आंबेडकरी समुदाय व इतर मागासवर्गी अनुसूचीत जातीच्या समाजाची मोठी संख्या आहे. जयभीमनगरला डॉ. आंबेडकर नगर, समजानगर, राजनगर, श्रावस्तीनगर, लालवाडी मिल एरिया, देगांव चाळ, भय्यासाहेब आंबेडकरनगर, लेबर कॉलनी, प्रभात नगर, हर्षनगर, पौर्णिमानगर, दोन्ही तरोडा, खोब्राकडेनगर, गांधीनगर, हमालपुरा, सांगवी आणि एकूणच शहराला लागुन असणा-या नागरिकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने सांस्कृतिक सभागृह बांधण्यात यावे या विधायक कामासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ती जमीन हस्तांतरीत करुन घेणेसाठी पालकमंत्री मा. अशोकराजी चव्हाण साहेब व जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे मागणी प्रस्ताव पाठविण्यात यावा असा प्रस्ताव हि सर्वसाधारण सभा पारीत करीत असुन तो याच सभेत मंजुर करण्यात येतो.

सुचक :- बापुराव गजभारे, अनुमोदक :- संदीप सोनकांबळे, दयानंद वाघमारे

विषय क्रं. 02

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 11 मधील रहेमतनगर येथे जि.प. प्रा.शा (उर्दु) सुरु असुन इयत्ता वर्ग-1 ते इयत्ता वर्ग-8 वी पर्यंत जवळपास 350 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. सदरची शाळा ही भाडयाच्या इमारतीमध्ये चालते परंतु शासनाने भाडे अदा करणे बंद करुन शाळा नजीकच्या जि.प. शाळेस जोडण्याचे कळविले आहे.

परंतु सदरच्या भागात गरीब लोकांची वस्ती असुन शाळा स्थलांतर झाल्यास गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असुन याबाबत पालक वर्गांनी शिक्षण विभाग, जि.प. नांदेड यांना विनंती केल्याने त्यांनी जागा उपलब्ध करुन दिल्यास त्या जागेत जि.प. तर्फे इमारत उभारुन शाळा त्याठिकाणी चालविण्याचे मान्य केले आहे.

तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊनये यासाठी सर्व्हे नं. 161 मनपा मालकीच्या पाण्याच्या टाकी परिसरामधील शाळेसाठी जागा नाममात्र भाडेवर दिल्यास त्याच परिसरामध्ये शाळा सुरु राहील. सदरची जागा गार्डनसाठी आरक्षित असून हया अगोदर मनपा तर्फे नॅशनल आय.टी.आय. साठी जवळपास 3.5 एकर नाममात्र भाडयावर दिली आहे. तसेच 01 एक जागा 11 के.व्हीए. विधुत उपकेंद्रसाठी बाजार भावाप्रमाणे दिली आहे.

करिता पाण्याची टाकी परिसरातील जागा जि.प. शाळेस नाममात्र भाडयावर देण्यास तसेच देण्यात येणा-या इतकी जागेचे आरक्षण बदलुन, पब्लीक सेमीपब्लीक वापरासाठी 37(1) ची कार्यवाही पाठविण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते.

याबाबत आयुक्त यांनी 37(1) च्याकार्यवाहीच्या अधीन राहून शाळा लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने जागा हस्तांतरणाची कार्यवही करावी.

सुचक :- म.मसुद अहेमद खान म.उस्मान खान अनुमोदक :- स. शेर अली

Scanned with CamScanner

विषय क्रं. 03 प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सदस्या डॉ. आरशीया कौसर पिता मो. हबीब यांनी ( तवाफे आलम ) हे उर्दु व इंग्रेजी मध्ये पुस्तक लिहिले आहे त्यांचे प्रकाशन उर्दु घर येथे झाले असुन त्यांच्या या कार्याबद्दल महानगरपालिके तर्फे सत्कार समारंभ करुन मनपा तर्फे त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्या बाबत तसेच सदरील पुस्तक हे AUSTN MACAULETY PUBLISHERS मार्फत LONDON, CAMBERIDGE, NEW YORK AND SHARJAH येथुन इंग्रेजी मध्ये अनुवाद करुन प्रकाशीत होणार आहे.

त्यामुळे वरील सर्व बाबीचा विचार करता डॉ. आरशीया कौसर पिता मो. हबीब मनपा सदस्या यांचे मनपा तर्फे अभिनंदन करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- शबाना बेगम मो. नासेर अनुमोदक :- फरहत सुलताना खुर्शीद जागीरदार

विषय क्रं. 04 प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 18 मध्ये संपुर्ण भागात तसेच पंचशीलनगर (नविन ईदगाह) येथे दाट वस्ती झालेली असल्यामुळे या भागातील गल्ली बोळात अमृत योजनेअंतर्गत पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आलेली असुन त्यास पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याची टाकी नसल्यामुळे तेथील नागरीक वारंवार स्थानिक नागरीकांकडे तक्रारी करीत आहेत. तसेच भागातील सर्वसाधारण सभेत हद्दवाढीचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला असुन त्या हद्दवाढीमध्ये प्रभागालगत असलेला हस्सापूर समाविष्ठ करण्यात आलेला असुन त्याठिकाणी राहणा-या रहिवाश्यांची सुध्दा पाणी पुरवठयाची मागणी वाढणार आहे त्यामुळे सध्या सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी व भविष्यातील वाढत्या मागणीचा विचार करता एक नविन पाण्याच्या टाकीची अत्यंत आवश्यक्ता आहे.

त्यामुळे महानगरपालिकेस शासनाने वितरीत केलेल्या निधीतून प्रभाग क्रं. 18 मधील पंचशिलनगर (नविन ईदगाह) भागामध्ये 12.00 लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यासाठी खर्च करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- शोएब आफाख स. मजहर हुसेन अनुमोदक :- रजिया बेगम बाबु खान

विषय क्रं. 05 प्रस्ताव

केंद्र शासन व राज्य शासना मार्फत प्राप्त होणा-या निधीतुन मनपा हद्दीतील विकासाचे कामे करण्यास मान्यता देते बाबत.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले अनुमोदक :- कनकदंडे महेश

विषय क्रं. 06 प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत कौठा येथील बॉमबशोधक पथक ते पश्चिम वळण रस्त्या पर्यंत रस्ता रुंदीकरणासाठी जागा भुसंपादन करण्यास मान्यता देणे बाबत.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले अनुंमोदक:- कनकदंडे महेश

विषय क्रं. 07 प्रस्ताव

नांदेड वाघाळाशहर महानगरपालिका हद्दीत खालसा हायस्कुल जवळ रेल्वे अंडरब्रिज (RUB) साठी जागा भुसंपादन करण्यास मान्यता देणे बाबत.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले अनुमोदक:- आनंद चव्हाण

Scanned with CamScanner

प्रस्ताव

विषय क्रं. 08

नांदेड वाघाळा शहर महानगरकपालिकेच्या अर्धवट असलेल्या शॉपिंग कॉम्पलेक्सचे बांधकामासाठी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

सुचकः- आनंद चव्हाण

अनुमोदक :- कनकदंडे महेश

प्रस्ताव

विषय क्रं. 09

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हृद्दीतील प्रभाग क्रं. 17 मधील मुथा चौक वजिराबाद येथे मागील कांही दिवसापुर्वी महानगरपालिकेकडून नव्याने ट्रॉफिक सिग्नल बसविण्यात आले असुन त्या सिग्नलच्या तिन्ही बाजुने संरक्षक भिंत बांधण्यात आलेली आहे. यापुर्वी महानगरपालिकेकडून सदर चौकाचे मुथा चौक असे नामकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे नव्याने बसविण्यात आलेल्या टॉफिक सिग्नलच्या संरक्षक भिंतीवर सर्व बाजुंनी रेडीयम कलर मध्ये मुथा चौक असे नांव टाकण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

सुचक :- प्रभादेवी यादव

अनुमोदक :- गुरमितसिंघ (डिम्पल) नवाब

(मा. महापौर यांच्या मान्यतेने)

स्वाक्षरीत/-

(स. अजीतपालसिंघ संधु)

नगरसचिव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

Scanned with CamScanner